



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २५८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.३० एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मृत बहिणीचे शव खांद्यावर घेऊन बँकेत आला भाऊ
## 'जिवंत आणा तरच पैसे' म्हणणाऱ्या बँकेच्या नियमांमुळे संताप



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, क्योंझर (ओडिशा) :** 'जिवंत नसेल तर पैसे मिळणार नाहीत' या बँकेच्या जाचक अटीमुळे ओडिशात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. मृत बहिणीच्या खात्यातील पैसे काढण्यासाठी एका भावाला चक्क तिचे शव कबरेतून बाहेर काढून गोणीत भरून बँकेत आणावे लागले. या घटनेचे फोटो व व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखे व्हायरल होत आहेत.

**नेमके काय घडले?**

ओडिशातील क्योंझर जिल्ह्यातील पाटणा ब्लॉकमधील मल्लीपासी येथील ओडिशा ग्राम्य बँकेच्या शाखेत हा धक्कादायक प्रकार घडला. डायनाली गावातील जितू मुंडा (वय अंदाजे ५०-५५) या आदिवासी व्यक्तीची बहीण कालरा मुंडा (वय ५६) हिचा २६ जानेवारी २०२६ रोजी मृत्यू झाला होता. तिच्या खात्यात १९,३०० ते २०,००० रुपयांच्या दरम्यान रक्कम होती. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने जितूला त्या पैशांची नितांत गरज होती.

**बँकेची अजब अट**

जितूने अनेकदा बँकेत जाऊन बहिणीच्या मृत्यूची माहिती दिली. मात्र, बँकेतील कर्मचाऱ्यांनी खातेदार जिवंत नसेल तर पैसे मिळणार नाहीत, मृत्यू प्रमाणपत्र किंवा प्रत्यक्ष खातेदाराला हजर करा अशी अट घातली. मृत्यू प्रमाणपत्र काढण्यासाठीही त्याच्याकडे पैसे नव्हते.

**अखेर कबर उकरली**

या जाचक नियमांमुळे त्रस्त झालेल्या जितूने अखेर टोकाचे पाऊल उचलले. आपली बहीण मरण पावली आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याने तिची कबर उकरून तिचे सापळा झालेले शव गोणीत भरले आणि खांद्यावर घेऊन थेट बँकेत आणले.

**बँकेत एकच खळबळ**

गोणीतून मृतदेहाचे अवशेष बाहेर काढताच बँकेत एकच खळबळ उडाली. ग्राहकांची धावपळ सुरू झाली. प्रकाराची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने दखल घेतली. जितूला पैसे मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडून मदत करण्यात आल्याची माहिती आहे.

**'आम्ही विश्वगुरू कसे?'**

या घटनेमुळे सरकारी बँकांमधील अत्यंत कठोर नियम आणि त्यामुळे सामान्य, गरीब आदिवासी माणसाची होणारी कुचंबणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. एका २० हजार रुपयांसाठी भावाला बहिणीची कबर उकरावी लागते, ही घटना देशाला अंतर्मुख करणारी आहे. 'अशा घटनांवरून आम्ही विश्वगुरू म्हणून कसे मिरवणार?' असा संतप्त सवाल सोशल मीडियावर विचारला जात आहे.

## ठाणे - नाशिक प्रवास आता अधिक वेगवान होणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२९, ठाणे :** मुंबई-नाशिक महामार्गावरील साकेत उड्डाणपुलावरील एक मार्गिका काहीबदिवसापूर्वी वाहतुकीसाठी खुली करण्यात आल्यानंतर आता कालव्यातील खारेगाव खाडी उड्डाणपूलही आज २९ एप्रिल रोजी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.ठाणे जिल्ह्यातील वाहतुकीसाठी महत्त्वाचा असलेला हा ८२५ मीटर लांबीचा हा नवा पूल असून यामुळे वाहन चालकांना चार पदरी मार्गिका वाहतुकीसाठी उपलब्ध होणार आहे.

जुन्या खाडी पूलावरील मार्गिका अरुंद होत्या. एकाच पुलावरून दोन्ही दिशेकडील वाहतुक होत असल्याने वाहतुक कोंडी मन:स्ताप चालकांना सहन करावा लागत होता. नवा खाडी पूल सुरु झाल्याने मुंबई, ठाणे, मुंब्रा, कळवा, भिवंडी, कल्याण, नाशिक शहरातील तसेच समृद्धी महामार्गाने मुंबई, ठाणे शहराच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना वाहतुक कोंडीतून दिलासा मिळणार आहे.

दरम्यान मुख्य रस्त्याचे काम ९० टक्के पूर्ण झाले असून मे महिन्याच्या अखेरपर्यंत माजिवडा -वडपे मार्गावरील सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन राज्य रस्ते विकास महामंडळाचे (एमएसआरडीसी) आहे. मुंबई नाशिक महामार्गावरील माजिवडा ते वडपे रस्ता रुंदीकरणाचे काम २०२१ पासून एमएसआरडीसीकडून सुरु आहे. हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास हा रस्ता दुरुस्त करणे शक्य झाले नसल्याने एमएसआरडीसी विभागाने या प्रकल्पाचे काम हाती घेतले होते. करोनाचा प्रादुर्भाव, दररोज सुरु असलेली जड-अवजड वाहतुक, पाऊस तसेच तांत्रिक अडचणींमुळे हा प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण झाला नाही.

येथील खारेगाव खाडीवर सुमारे ४० वर्ष जुना अरुंद खाडी पूल आहे. जुन्या पूलावर चार पदरी मार्गिका असून या मार्गिकांवरून दोन्ही दिशेकडील वाहतुक सुरु होती. त्यामुळे खड्डे, अवजड वाहनांच्या वाहतुक यामुळे खारेगाव खाडी पूलावर प्रचंड वाहतुक कोंडी होते. त्याचा परिणाम भिवंडी येथील माणकोली, दिवे, मुंब्रा, कळवा आणि ठाणे शहरातील माजिवडा, साकेत भागातील वाहतुकीवर होते. वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्रकल्पांतर्गत जुन्या खाडी पूलालगत नव्याने पूल बांधण्याचे महत्त्वपूर्ण काम पूर्ण झाले आहे.

जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते या पूलाचे लोकार्पण करण्यात आले. बुधवारी सकाळी १०.४५ वाजताच्या सुमारास नव्या पूलावरून मुंबई, ठाणे, मुंब्रा, कळवा येथून भिवंडी, कल्याण, नाशिकच्या दिशेने वाहतुक करणारी वाहने सोडली गेली. तर जुन्या पूलावरून भिवंडी, कल्याण, नाशिक आणि समृद्धी महामार्गावरून ठाणे, मुंबईच्या दिशेने सुटणारी वाहतुक सोडली गेली. त्यामुळे जुन्या पूलावरील वाहनांचा भार मोठ्याप्रमाणात हलका झाला आहे.

माजिवडा-वडपे या प्रकल्पाची मुख्य मार्गिका २३.८० किमी लांबीचा असून २१.३१ किमी लांबीची कामे पूर्ण झाली आहेत. त्यानुसार हा प्रकल्प ९० टक्के पूर्ण झाला आहे. तर सेवा रस्ते १८.३५ किमी लांबीचे असून त्यापैकी १६.८८ किमी लांबीची कामे पूर्ण झाली. हा प्रकल्प मे महिन्याच्या अखेरीस म्हणजेच, पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन 'एमएसआरडीसी'चे आहे. पूलावर डांबरीकरण जुना खारेगाव खाडी पूल अत्यंत अरुंद आहे. या पूलावर पावसाळ्यात खड्डे पडतात. त्यामुळे जुन्या पुलाच्या दुरुस्तीचे काम देखील हाती घेतले जाणार आहे. जुन्या पूलावरील चार पैकी एक पदरी मार्गिका वाहतुकीसाठी काही काळ बंद केली जाणार आहे.या नवीन पुलावर टप्प्या-टप्प्याने डांबरीकरण केले जाणार आहे असे एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## पुणे हादरलं! भर रस्त्यात कोयत्याने हल्ला; कुख्यात गुंड राणा कांबळेची हत्या



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, पुणे :** शहरात गुन्हेगारी पुन्हा डोके वर काढत असल्याचे चित्र समोर येत असून गंगानगर परिसरात भर रस्त्यात तडीपार गुंडाची निर्घृण हत्या करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. राणा कांबळे असे मृत गुंडाचे नाव असून त्याच्यावर कोयत्याने सपासप वार करत त्याचा खून करण्यात आला. या संपूर्ण घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागला असून तपासाला वेग आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राणा कांबळे हा गेल्या अनेक महिन्यांपासून तडीपार होता. मात्र, तडीपार असतानाही तो गंगानगर परिसरात सक्रिय होता आणि स्थानिकांमध्ये त्याची दहशत होती. त्याच्याविरोधात चोरी, मारामारीसह अनेक गंभीर गुन्हे दाखल होते.

दरम्यान, गंगानगर परिसरात राणा कांबळे आणि ओम मोरे यांच्यात वर्चस्वाच्या कारणावरून वाद सुरू होता. हा वाद चिघळल्यानंतर ओम मोरे आणि त्याच्या साथीदारांनी कांबळेला रस्त्यात गाठले. सुरुवातीला त्यांच्यात जोरदार बाचाबाची झाली. त्यानंतर ओम मोरे आणि त्याच्या दोन साथीदारांनी कोयत्यांनी कांबळेवर जीवघेणा हल्ला चढवला. हल्ला इतका भीषण होता की कांबळे रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावरच कोसळला.

विशेष म्हणजे, या हत्येचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून पोलिसांनी तो व्हिडिओ ताब्यात घेतला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, पुणे जिल्ह्यात मागील दहा दिवसांत तीन हत्यांच्या घटना घडल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. काही दिवसांपूर्वी मावळ तालुक्यातही दोन हत्या झाल्या होत्या. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

पोलिस आयुक्तांनी गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्याचे आदेश दिले असतानाही अशा घटना घडत असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. गुन्हेगारांचा वाढता हैदोस पाहता पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरत आहे. शहरात रोज रोज होणारे कोयत्याचे हल्ले, गोळीबार आणि वाढती गुन्हेगारी हे पोलिसांसमोर मोठं आव्हान ठरत असून या थरारक घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## ठाकरेंचं ठरलं! विधान परिषदेसाठी उमेदवार जाहीर, जुन्या शिलेदाराला पुन्हा संधी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, मुंबई :** विधान परिषदेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. माजी मंत्री आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी विधान परिषदेसाठी अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा केली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी ते उद्या उमदवारी अर्ज दाखल करतील. शिवसेना उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या नावाची घोषणा केल्याची माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली आहे.

विधान परिषदेचे माजी आमदार अंबादास दानवे यांनाच उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा परिषदेवर संधी दिली आहे. ऑगस्ट २०१९ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत दानवे विधान परिषदेचे सदस्य होते. ऑगस्ट २०२२ पासून त्यांच्याकडे विधान परिषदेचं विरोधी पक्षनेतेपद होतं. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतरही ते उद्धव ठाकरेंसोबत कायम राहिले. ठाकरेसेनेकडून विधान परिषदेसाठी सुषमा अंधारे, राजन विचारेंची नावं चर्चेत होती. पण ठाकरेंनी दानवे यांना पुन्हा एकदा परिषदेवर संधी दिली आहे.

विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक होणार आहे. विरोधी बाकावर असलेल्या महाविकास आघाडीकडे असलेलं संख्याबळ पाहता, त्यांना केवळ एक जागा जिंकता येऊ शकते. उद्धव ठाकरेंनी पुन्हा एकदा विधान परिषदेवर जावं यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष आग्रही होता. पण ठाकरेंनी पुन्हा विधान परिषदेवर जाणं टाळलं आहे. त्यांनी अंबादास दानवे यांना संधी दिली आहे.

उद्धव ठाकरेंनी विधान परिषदेवर जावं, अन्यथा ही जागा काँग्रेसला सोडावी, अशी भूमिका काँग्रेसकडून घेण्यात आली होती. पण ठाकरेंनी विधान परिषदेवर जाणं टाळत दानवे यांना संधी दिली आहे. त्यामुळे आता काँग्रेस काय भूमिका घेणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.

विधान परिषदेची एक जागा जिंकण्यासाठी २९ मतांची आवश्यकता आहे. विधानसभेत ठाकरेंच्या शिवसेनेचे २० आमदार आहेत. तर काँग्रेसचे १६ आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे १० आमदार आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचं एकत्रित संख्याबळ ४६ च्या घरात जातं. त्यामुळे दानवे सहज निवडून येऊ शकतात. पण महायुतीनं अधिकचा उमेदवार दिल्यास निवडणूक होईल. अशा परिस्थितीत मतांची फाटाफूट होऊ शकते.

## महाशिवलिंग विकासासाठी वेकोलि सीएमडींची पाहणी...
## आ. किशोर जोरगेवार यांच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** शहरालगत असलेल्या महाशिवलिंग परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आ. किशोर जोरगेवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आता गती मिळताना दिसत आहे. त्यांच्या पुढाकारातून वेकोलीचे सिएमडी हेमंत पांडे यांनी आमदार किशोर जोरगेवार व विविध संबधित अधिका-यांसह महाशिवलिंग क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करत प्रस्तावित विकासकामांचा आढावा घेतला.

यावेळी वेकोलीचे महाप्रबंधक संजिव रेड्डी, मनपा उपअभियंता आशिष भारती, सार्वजनिक बांधकाम विभागचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता साबळे, भारतीय जनता पार्टीचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री सविता दंढारे, रविंद्र गुरुनुले, बलराम डोडाणी, मनपा गटनेते शेखर शेट्टी, अजय जयसवाल, तुषार सोम, श्याम ढोपटे, प्रिंन्स प्रसाद आदिंची उपस्थिती होती.

या पाहणीदरम्यान आ. जोरगेवार यांनी महाशिवलिंग क्षेत्राच्या एतिहासिक धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या असलेल्या महत्त्वावर विशेष भर देत, येथे येणार्या हजारो भाविकांसाठी मूलभूत सुविधा निर्माण करणे अत्यावश्यक असल्याचे म्हटले. वाढत्या भाविकसंख्येमुळे पाणी, स्वच्छता, रस्ते, प्रकाशव्यवस्था आणि सुरक्षेच्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची गरज त्यांनी यावेळी बोलुन दाखविली.



आमदार जोरगेवार यांनी वेकोलि प्रशासनासमोर सविस्तर विकास आराखडा मांडत पिण्याच्या स्वच्छ पाण्यासाठी आरओ प्लांट, जलपुरवठा सुधारणा, मंदिर परिसराचे सुशोभीकरण, सुरक्षा भिंत, सोलर हायमास्ट लाईट, प्रशासकीय कार्यालय, तसेच भक्तांसाठी निवास व्यवस्था याबाबत सविस्तर चर्चा केली. यासोबतच महाशिवलिंगपर्यंत जाणाऱ्या मार्गाचे मजबुतीकरण, स्वागतद्वारांची उभारणी, दिशादर्शक फलक, स्वच्छतागृहे आणि परिसरातील स्वच्छता मोहीम यांसारख्या सुविधांवरही त्यांनी विशेष भर दिला.

पाहणीदरम्यान वेकोलि अधिकाऱ्यांनीही या प्रस्तावांचा सकारात्मक विचार करण्याचे संकेत दिले असून आवश्यक तांत्रिक व आर्थिक बाबींचा आढावा घेऊन लवकरच निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. आ. जोरगेवार यांनी या कामांसाठी वेकोलिकडून आवश्यक निधी व तांत्रिक सहकार्य मिळावे, यासाठी पुढील स्तरावरही पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.

महाशिवलिंग क्षेत्राचा विकास झाल्यास चंद्रपूरच्या पर्यटन नकाशावर या स्थळाला नवे स्थान मिळेल, तसेच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास आ. जोरगेवार यांनी व्यक्त केला. त्यांच्या पुढाकारामुळे महाशिवलिंग परिसराचा कायापालट होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.




## चर्चा तर होणारच...

भौगोलिकदृष्ट्या हंगेरी हा देश साधारणपणे पश्चिम बंगाल एवढा आहे, तर या संपूर्ण देशाची लोकसंख्या केवळ कोलकाता शहराच्या लोकसंख्येइतकी आहे. मात्र, हंगेरीची चर्चा आज केवळ युरोपमध्येच नव्हे, तर संपूर्ण जगात होत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे तेथे नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुका आणि त्यातून समोर आलेला अनपेक्षित निकाल. गेल्या सोळा वर्षांपासून सत्तेवर असलेल्या व्हिक्टर ऑर्बान यांना हंगेरीच्या जनतेने नाकारल्याने जागतिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

मध्य युरोपातील हंगेरी हा भू-राजकीय दृष्ट्या अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आहे. पूर्वेकडील देशांसाठी 'युरोपीय युनियन'चे प्रवेशद्वार म्हणून या देशाकडे पाहिले जाते. 'युरोपीय युनियन' आणि 'नाटो' यांसारख्या संघटनांचा सदस्य असल्याने युरोप आणि अमेरिकेच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावण्याची क्षमता हंगेरीकडे आहे. मात्र २०१३ मध्ये व्हिक्टर ऑर्बान यांनी त्यांना मिळालेल्या प्रचंड बहुमताचा वापर करून हंगेरीच्या राज्यघटनेतच आमूलाग्र बदल घडवून आणले. राजकीय व्यवस्थेसोबतच स्वतःला कायमस्वरूपी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यासाठी त्यांनी न्यायव्यवस्थेवर प्रहार केला; ज्या न्यायाधीशांनी त्यांच्या निर्णयांना विरोध केला, त्यांना पदावरून हटवून न्यायसंस्थेचे खच्चीकरण केले. सत्तेच्या केंद्रीकरणामुळे लोकशाही संस्थांचे अवमूल्यन होऊन निवडणुका केवळ एक औपचारिकता उरतात की काय, अशी भीती निर्माण झाली. ऑर्बान यांनी केवळ न्यायसंस्थाच नव्हे, तर प्रसारमाध्यमांवरही आपली पकड मजबूत केली. त्यांच्या निकटवर्तीय उद्योगपतींनी देशातील प्रमुख मीडिया कंपन्या विकत घेतल्या, ज्यामुळे विरोधी पक्षांना मिळणारा अवकाश आणखी कमी झाला. मतदारसंघांची पुनर्रचना अशा प्रकारे केली गेली; जेणेकरून सत्तारूढ पक्षाला फायदा होईल. इतकेच नव्हे तर, उच्च शिक्षणाचे केंद्र असलेल्या विद्यापीठांचे खासगीकरण करून ती सरकारी नियंत्रणाखाली आणली गेली.

ऑर्बान सरकारच्या या कार्यपद्धतीमुळे युरोपीय संसदेने हंगेरीचा उल्लेख 'निवडणूक निरंकुशतेचे संकरित राज्य' असा केला होता. मात्र, सत्तेच्या या अति-राजकीयीकरणाला आणि भ्रष्टाचाराला हंगेरीच्या जागृत मतदारांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. आर्थिक स्तरावरील बेताची कामगिरी आणि प्रशासकीय अनागोंदीमुळे जनतेमध्ये असंतोष खदखदत होता. जेव्हा एखादी व्यक्ती हतबल असते, तेव्हा ती महाशक्तीचा आधार घेते; परंतु जेव्हा तीच व्यक्ती संघटित होऊन उभी राहते, तेव्हा ती वंचितांना बळ देते. लोकशाहीची ही खरी ताकद आहे. हे हंगेरीच्या जनतेने या निवडणुकीत सिद्ध केले आहे. शक्तिहीन ठरलेल्या विरोधी पक्षांच्या पाठीशी उभे राहून मतदारांनी लोकशाहीला नवसंजीवनी दिली आहे.

हंगेरीच्या या ऐतिहासिक निवडणुकीत पीटर माग्यार यांनी अभूतपूर्व विजय मिळवला असून, त्यांच्या पक्षाने कायदेमंडळात 'दोन तृतीयांश' जागा जिंकून निर्विवाद बहुमत प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे, पीटर हे एके काळी व्हिक्टर ऑर्बान यांचे निकटवर्तीय सहकारी होते आणि त्यांच्या पत्नीने ऑर्बान यांच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम पाहिले आहे. परराष्ट्र धोरण आणि मूळ विचारसरणीच्या बाबतीत पीटर हे ऑर्बान यांच्यापेक्षा फारसे वेगळे नसले, तरी त्यांच्या विजयाची कारणे वेगळी आहेत. ग्रामीण भागात त्यांनी घेतलेली प्रचंड मेहनत आणि ऑर्बान सरकारच्या विरोधात जनतेमध्ये असलेली तीव्र नाराजी पीटर यांच्यासाठी विजयाची मोठी लाट ठरली. हंगेरीच्या मतदारांनी ऑर्बान यांच्याप्रमाणेच पीटर यांनाही 'राक्षसी बहुमत' दिले आहे. अशा वेळी सत्तेचा उन्माद न चढू देता, पीटर यांनी पराभूत विरोधकांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने मार्गक्रमण करणे गरजेचे आहे.

हंगेरीचा इतिहास संघर्षाने भरलेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर झालेली देशाची फाळणी आणि दुसऱ्या महायुद्धानंतर देशावर लादली गेलेली साम्यवादी राजवट, यांतून बाहेर पडण्यासाठी हंगेरीच्या जनतेने मोठा लढा दिला आहे. यापुढे पुन्हा एकदा हुकूमशाहीकडे झुकणारी व्यवस्था निर्माण होऊ नये आणि जनतेला पुन्हा अशा संघर्षाला सामोरे जावे लागू नये, हीच अपेक्षा आहे. अलीकडच्या काळात व्हिक्टर ऑर्बान यांनी हंगेरीच्या परराष्ट्र धोरणाची दिशा पूर्णपणे बदलली होती. त्यांनी 'युरोपीय युनियन' पेक्षा चीन, रशिया आणि मध्य आशियातील देशांना अधिक प्राधान्य दिले. युरोपीय युनियनच्या धोरणांना त्यांनी नेहमीच विरोध केला, ज्यामुळे हंगेरीला मिळणारा अनेक कल्याणकारी योजनांचा निधी युरोपियन युनियनने रोखून धरला होता. रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतरही ऑर्बान यांनी रशियाशी असलेले ऊर्जा सहकार्याचे संबंध तोडले नाहीत. युरोपीय युनियनने रशियावर लादलेल्या निर्बंधांकडे दुर्लक्ष करून त्यांनी रशियाकडून स्वस्त इंधनाचा पुरवठा सुरूच ठेवला. ऑर्बान यांचा हा 'रशियाधार्जिणा' दृष्टिकोन युरोपला खटकणारा होता. म्हणूनच, या पराभवाचे वर्णन 'रशिया हरला आणि युरोप जिंकला' अशा शब्दांत केले गेले.

**- डॉ.मनीष सोनवणे**

# भगवान बुद्ध : करुणा, प्रज्ञा आणि समतेचा शाश्वत मार्ग



भारतीय संस्कृतीच्या विशाल परंपरेत अनेक महामानवांनी मानवतेला दिशा दिली; परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे विचार काळाच्या सीमाही ओलांडतात. भगवान गौतम बुद्ध हे असेच विश्वमानव होते. त्यांनी केवळ एका धर्माची स्थापना केली नाही, तर माणसाला माणूस म्हणून जगण्याचा नवा मार्ग दिला. बुद्ध जयंती हा केवळ धार्मिक उत्सव नाही; तो करुणा, विवेक, समता आणि शांततेच्या मूल्यांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. आज जग हिंसा, असहिष्णुता, विषमता आणि मानसिक अस्थिरतेच्या छायेत उभे असताना बुद्धांचे विचार अधिकच तेजस्वी वाटतात. सहाव्या शतकात कपिलवस्तूच्या राजघराण्यात सिद्धार्थ गौतम ांचा जन्म झाला. वैभव, सत्ता आणि सुखसोयींच्या वातावरणात वाढलेला हा राजकुमार एका दिवशी वृद्धापकाळ, आजार, मृत्यू आणि संन्यासी या चार दृश्यांनी अंतर्मुख झाला. जीवन म्हणजे केवळ ऐश्वर्य नव्हे, तर दुःख, संघर्ष आणि अनिश्चिततेची शृंखला आहे, याची त्यांना जाणीव झाली. या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवाडा, सत्ता आणि सांसारिक मोह सोडला. ही घटना केवळ एका व्यक्तीचा त्याग नव्हती; ती मानवी इतिहासातील सत्यशोधाची क्रांतिकारी सुरुवात होती.

दीर्घ तपश्चर्या, चिंतन आणि आत्मसंवादानंतर बोधगया येथे पिंपळवृक्षाखाली सिद्धार्थांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' झाले, जागृत झालेले. त्यांनी जगाला सांगितले की दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा निरोध शक्य आहे आणि त्यासाठी मार्गही आहे. ही चार आर्यसत्ये मानवी जीवनाचे वास्तववादी विश्लेषण आहेत. बुद्धांनी दुःख नाकारले नाही, तर त्यावर उपाय सुचवला. म्हणूनच त्यांचे तत्त्वज्ञान निराशेचे नव्हे, तर आशेचे आहे. बुद्धांनी सांगितलेला अष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यक दृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयास, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी. हा मार्ग केवळ धार्मिक साधनेसाठी नाही, तर संतुलित आणि नैतिक जीवनासाठी आहे. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जगात हा मार्ग अधिकच महत्त्वाचा ठरतो. माणूस बाहेरून प्रगत झाला आहे; पण आतून अस्थिर झाला आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान मनाला स्थैर्य देणारे आहे.

भगवान बुद्धांचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्यांनी समतेचा ध्वज उंचावला. त्या काळातील वर्णव्यवस्था, कर्मकांड, जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व आणि सामाजिक विषमता यांना त्यांनी थेट आव्हान दिले. त्यांनी स्पष्ट सांगितले, माणूस जन्माने मोठा होत नाही; तो कर्माने मोठा होतो. त्यांच्या संघात सर्व जातींचे, सर्व स्तरांतील लोकांना समान प्रवेश होता. स्त्रियांनाही त्यांनी भिक्षुणी संघात स्थान दिले. हे त्या काळातील सामाजिक क्रांतीचे अद्वितीय उदाहरण होते. आज आपण संविधान, लोकशाही आणि समानतेबद्दल बोलतो; पण या मूल्यांची बीजे बुद्धांच्या विचारांत दिसतात. त्यांनी कोणालाही कमी लेखले नाही, कोणालाही देवत्व देऊन गुलाम केले नाही. त्यांनी माणसाला विचार करायला शिकवले. अंधश्रद्धेने स्वीकारू नका; तपासा, विचार करा आणि मग स्वीकारा, हा त्यांचा संदेश होता. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा हा मूलमंत्र आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

आजच्या समाजात धार्मिक उन्माद वाढताना दिसतो. श्रद्धेपेक्षा प्रदर्शन, अध्यात्मापेक्षा बाजारपेठ आणि धर्मापेक्षा द्वेष अधिक ठळकपणे समोर येतो. अशा वेळी बुद्धांची शिकवण आपल्याला संयम आणि विवेकाची आठवण करून देते. बुद्धांनी धर्माला भयाचे साधन बनवले नाही; त्यांनी धर्माला मुक्तीचा मार्ग बनवला. त्यांनी सांगितलेला धर्म म्हणजे करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि अहिंसा. बुद्धांचे करुणेचे तत्त्वज्ञान आजच्या जगासाठी अमृतासमान आहे. युद्धे, दहशतवाद, जातीय हिंसा, कौटुंबिक तणाव, नैराश्य, स्पर्धा आणि असुरक्षितता यांमुळे माणूस आतून तुटत चालला आहे. अशा वेळी दुसऱ्याच्या दुःखाशी एकरूप होणे, संवेदनशील राहणे आणि शांततेचा मार्ग स्वीकारणे, ही बुद्धांची शिकवण जीवनदायी ठरते. मानसिक आरोग्याच्या संदर्भातही बुद्धांचे विचार महत्त्वाचे आहेत. आज जगभर चिंता, नैराश्य, तणाव आणि असमाधान वाढले आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि यश मिळूनही मन रिकामे वाटते. बुद्धांनी याचे कारण तृष्णा सांगितले. अमर्याद इच्छा, तुलना, लोभ आणि आसक्ती यामुळे मन अस्थिर होते. समाधान, सजगता आणि मध्यम मार्ग स्वीकारल्यास जीवन अधिक शांत होऊ शकते.

आधुनिक मानसशास्त्र आणि ध्यानपद्धतीत बुद्धांच्या विचारांचा प्रभाव स्पष्ट दिसतो. बुद्धांचा मध्यम मार्ग हा आजच्या अतिरेकाच्या काळातील सर्वांत मोठा संदेश आहे. एका बाजूला अति भोगवाद, दुसऱ्या बाजूला अति नकारवाद; एका बाजूला अंधश्रद्धा, दुसऱ्या बाजूला संवेदनाहीनता; एका बाजूला संपत्तीची स्पर्धा, दुसऱ्या बाजूला नैतिक दिवाळखोरी. या टोकांच्या जगात संतुलन राखणे म्हणजेच बुद्धांचा मध्यम मार्ग. भारतातील सामाजिक न्यायाच्या चळवळीवर बुद्धांचा मोठा प्रभाव आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धांच्या विचारांतून समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची आधुनिक मांडणी केली. लाखो वंचितांना मानवी सन्मानाचा मार्ग बुद्धधम्मातून मिळाला. म्हणूनच बुद्ध जयंती ही केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक मुक्तीची आठवणही आहे. पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार आधुनिक आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल दया बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद साधत जगण्याचा मार्ग दाखवला. आज हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण आणि संसाधनांची लूट यामुळे पृथ्वी संकटात आहे. लोभावर नियंत्रण आणि मर्यादित उपभोग ही बुद्धांची शिकवण पर्यावरणरक्षणासाठीही मार्गदर्शक आहे.

आजच्या राजकारणात कटुता, समाजकारणात दिखावा आणि सार्वजनिक जीवनात असहिष्णुता वाढताना दिसते. मतभेद शत्रुत्वात बदलत आहेत. सोशल मीडियावर अपमानाची भाषा सामान्य झाली आहे. अशा वेळी बुद्धांची सम्यक वाणी आठवावी लागते. सत्य बोला, पण कटुतेशिवाय; ठाम बोला, पण द्वेषाशिवाय; मत मांडा, पण मानहानी न करता, ही लोकशाही संस्कृतीची खरी पायाभरणी आहे. बुद्ध जयंती हा केवळ मिरवणुका, रोषणाई किंवा औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसावा. तो आत्मपरीक्षणाचा दिवस असावा. आपण किती संयमी आहोत? आपण दुसऱ्याच्या वेदना समजून घेतो का? आपण जात, धर्म, भाषा, पंथ यांच्या भिंती ओलांडून माणसाला माणूस म्हणून स्वीकारतो का? आपण विवेकाने विचार करतो का? हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. आज गरज आहे बुद्धांना पूजण्यापेक्षा बुद्धांना समजून घेण्याची. त्यांच्या मूर्तीसमोर अगरबत्ती लावणे सोपे आहे; पण मनातील द्वेष विझवणे कठीण आहे. त्यांच्या प्रतिमेला हार घालणे सोपे आहे; पण अहंकार उतरवणे कठीण आहे. जयंती साजरी करणे सोपे आहे; पण करुणा जगणे कठीण आहे. म्हणून बुद्धांचे खरे स्मरण कृतीतून व्हायला हवे. शाळांतून मुलांना स्पर्धेबरोबर संवेदनशीलता शिकवावी लागेल. समाजात न्यायाबरोबर संवाद वाढवावा लागेल. राजकारणात सत्ता नव्हे, तर सेवा महत्त्वाची ठरावी लागेल. कुटुंबात अधिकाराबरोबर स्नेह वाढवावा लागेल. आणि व्यक्तीने स्वतःमध्ये लोभाऐवजी समाधान, रागाऐवजी संयम आणि द्वेषाऐवजी मैत्री वाढवावी लागेल.

भगवान बुद्धांचे जीवन आपल्याला सांगते की, परिवर्तन बाहेरून नव्हे तर आतून सुरू होते. मन बदलले की समाज बदलतो. विचार बदलले की इतिहास बदलतो. करुणा जागी झाली की संघर्ष निवळतो. म्हणूनच बुद्ध आजही जिवंत आहेत ग्रंथांत नव्हे, तर प्रत्येक विवेकी कृतीत; मंदिरांत नव्हे, तर प्रत्येक दयाळू हृदयात. बुद्ध जयंतीनिमित्त आपण हा संकल्प करूया की, मतभेद असले तरी वैर नको, श्रद्धा असली तरी अंधत्व नको, प्रगती असली तरी अहंकार नको, संपत्ती असली तरी संवेदना हरवू नयेत. भगवान बुद्धांच्या २५८९ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! करुणा, प्रज्ञा आणि समतेचा त्यांचा शाश्वत प्रकाश आपल्या समाजाला नवी दिशा देवो, हीच मंगलकामना.

**- प्रविण बागडे, नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

## म-हाठी पाट्या

महाराष्ट्रात हव्याचं
मराठी मध्ये पाट्या
महाराष्ट्रां या राहून
कपाळी काआठ्या

मराठीची अस्मिता
वल्गना का खोट्या
समजावणारं कोण
लोकांना उरफाट्या

सहन करतो मुकाट
नाव ते कानफाट्या
आडदांड भरलेसांड
भीकनाही जनरेट्या

उस्फुर्त उन्मेष नसे
माशाबसे खरखट्या
भाषाएकच समजते
आवाज खळ् खट्या

मातृभाषा प्रेम नाही
इंग्रजाचे बूट चाट्या
सुधारती तेंव्हाच ते
कपाळा जातागोट्या

न्यायालय स्पष्ट सांगे
विवादास दे सुट्ट्या
कारवाई त्वरीत हवी
नको केवळ शिट्ट्या

दिखावा करती सारे
पुढे येतीलं नटनट्या
श्रेयाची लढाई चाले
इस्त्री मारती फेट्या

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## उन्हाळ्यात मुलांना घरगुती पेय द्या !

सध्या सर्वत्र उन्हाचा जोर वाढतो आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा अधिक उकाडा सहन करावा लागणार असल्याचा अंदाज हवामान खात्यानेही वर्तवला आहे. मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून शाळांना सुट्टी पडली आहे. अभ्यासाचा ताण नसल्याने मुले दिवसभरातील अधिकाधिक वेळ खेळण्यात व्यतीत करत आहेत. बाहेर खेळायला जाणाऱ्या मुलांना उन्हातान्हाची पर्वा नसते. अधिक वेळ उन्हात राहिल्याने घामावाटे शरीरातील पाणी आणि क्षार निघून जातात ज्यामुळे थकवा येतो. अशावेळी मुले घरी येऊन पालकांकडे कोल्ड्रिंक्स पिण्यासाठी पैसे मागतात. बऱ्याचदा पालकही त्यांना पैसे देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात. सध्या बाजारात मिळणारे अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे कोल्ड्रिंक्स लहान मुलांसाठी अपायकारक आहेत. अशा कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर ठळक अक्षरांत तशी सूचना लिहिणेही बंधनकारक करण्यात आले आहे. ही कोल्ड्रिंक्स जिभेला रुचकर वाटून मनाला गारवा देणारी असली तरी ती बनवण्यासाठी रसायनांचा आणि प्रीझर्वेटिव्हचा वापर करण्यात येत असल्याने लहान मुलांच्या नाजूक शरीरासाठी ती अत्यंत हानिकारक असतात. आहारतज्ज्ञांच्या मते कोल्डड्रिंक्समध्ये जास्त प्रमाणात साखर असते. साखर जास्त प्रमाणात पोटात गेल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा वाढू शकतो. मुले जास्त प्रमाणात कोल्ड्रिंक्स पित असतील तर त्यांच्या शरीरातील कॅलरीज वाढल्याने त्यांचे अनावश्यक वजन वाढू शकते. कोल्ड्रिंक्समध्ये असणाऱ्या साखर आणि अन्य रासायनिक घटकांमुळे मुलांचे दात किडण्याचा धोका संभवतो. थंड आणि रसायनयुक्त असलेले हे कोल्ड्रिंक्स दातांच्या मुळांना कमकुवत करतात. मुलांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण वाढल्याने मुलांमध्ये टाइप २ डायबिटीसचा धोका वाढू शकतो. काही थंड पेयांमधील रसायनांच्या अतिवापरामुळे मुलांच्या हाडांतील खनिजांचे प्रमाण कमी होऊन हाडे कमकुवत होतात ज्यामुळे मुलांमध्ये हाडांच्या दुखापतीचा आणि फ्रॅक्चरचा धोका वाढतो. १०० टक्के फळांचा रस असण्याचा दावा करणारे काही कंपन्यांचे फ्रुट ज्यूसचे टेट्रा पॅक बाजारांत उपलब्ध आहेत; मात्र त्यामध्ये प्रत्यक्षात फळांचा रस किती आणि इतर रसायने किती आहेत हे पॅकेटवरील घटकांचे प्रमाण वाचल्यावरच लक्षात येते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत असे तयार कोल्ड्रिंक्स मुलांना देऊन त्यांच्या आरोग्याशी खेळण्याऐवजी घरी तयार केलेले कोकम सरबत, लिंबू सरबत, ताक किंवा बाजारातून ताजी फळे आणून मुलांना फळांचा रस द्यावा. घरगुती पेय प्यायल्याने उन्हामुळे मुलांच्या शरीरात निर्माण होणारी पाण्याची कमतरता तर भरून निघेलच शिवाय मुलांना व्हिटॅमीन्स आणि मिनरल्ससुद्धा या पेयांतून मिळेल. केवळ मुलांसाठीच नव्हे तर मोठ्यांनीही उन्हाळ्यात रासायनिक शीतपेय पिण्याऐवजी घरगुती पेय पिऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती आणि आरोग्य जपावे !

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

## ग्लॅमरच्या रंगीन दुनियेत शॉर्टकट जीवनाला आळा बसणारं का ?

मोह हि फार वाईट गोष्ट असून अनेकांनी या मोहापायी चांगले चाललेले आयुष्य बरबाद करुन घेतले आहे. कमी अवधीत दुप्पट पैसे, पैशांचा पाऊस, एवढे गुंतवल्यास तेवढ्या सुखसोयींची हॉटेल्स, रिसॉर्ट मधील विलासी मुक्काम काही स्थावर संपत्तीची मालकी यासारख्या ऑफर्स घेवून गेल्या.

काही वर्षात अनेक व्यक्ती, संस्था आल्या आणि ठगवून गेल्या तरीही नविन कंपन्या येऊन फसविण्याचे प्रकार काही थांबता थांबेनात. याला काय म्हणावे ? आजच्या झगमगाटाच्या दुनियेत प्रत्येक व्यक्तीला चैनविलासी, आराम दायी, कमी श्रमात आणि कमी वेळेत अधिक नफा मिळावा म्हणून अनेक बड्या हस्थी देखिल फसव्या योजनेत गुंतवणूक करुन आयुष्य बरबाद केल्याच्या ताज्या घटना आहेत.

सुशिक्षित लोक जर फसत असतील तर अशिक्षितांचे काय ? कोणत्याही गोष्टींचा सारासार विचार न करता आपण कष्टाने मिळवलेली पुंजी यामध्ये लावायची आणि शेवटी व्याजासाठी मुद्दलेला मुखायचे सद्याचं युग हे स्पर्धात्मक आणि चंगळवादी आहे. त्यामुळे अनेकजण शॉर्टकट जिवन जगण्यात धन्यता मानतं आहेत त्यामुळे आशा घटना वाढत असल्याचे दिसून येते आहे. कोणीही उगाचचं कमी वेळेत मोठा लाभ देण्याचे आश्वासन देत नाहीत हे तरी जनतेने लक्षात घ्यायला हवे जनता फसत आहे. म्हणून फसविणारे असले उद्योग थाटतं आहेत. अनेक मोठ्या कंपन्यांचे न्यायालयीन खटले प्रलंबित आहेत. मात्र याचे प्रमुख उजळ माथ्याने समाजामध्ये वावरत आहेत. यांच्या मुसक्या वेळीच आवळल्या पाहिजेत तसेच जनतेनेही विवेकबुद्धीने अभ्यास करुन योग्य माहिती घेवून गुंतवणूक करणे गरजेचे आहे. नाहीतर व्याजासाठी मुद्दलेला मुखला अशी अवस्था व्हायला नको !

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# विंचूर परिसरात पालखेड कालव्याची दुरवस्था; पाणी गळतीमुळे शेतकरी हवालदिल





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२९, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील विंचूर परिसरातून वाहणाऱ्या पालखेड डाव्या कालव्याची सध्या प्रचंड दुरवस्था झाली असून, ठिकठिकाणी होणाऱ्या पाणी गळतीमुळे पिकांचे अतोनात नुकसान होत आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी विंचूर येथील रहिवासी निलेश दगडूजी चव्हाण यांनी नाशिक येथील पालखेड पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले असून, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

**गळतीची प्रमुख ठिकाणे आणि स्वरूप...**

विंचूर शिवारात अनेक ठिकाणी कालवा धोकादायक स्थितीत आहे:

**सोनवणे वस्ती व ढवण वस्ती :** डोंगरगाव रोड लगत असलेल्या या वस्त्यांजवळ कालव्याच्या सायपनची भिंत कोसळली असून दोन्ही बाजूंचा भराव पूर्णपणे खचला आहे.

**निमगाव रोड व सांगळे वस्ती :** सोनाराचा मळा आणि सांगळे वस्ती परिसरात कालव्याचे काँक्रिटीकरण फुटले असून भराव खचल्याने पाणी थेट शेतात शिरत आहे.

**शेतकऱ्यांना आर्थिक फटका !**

विंचूर हा भाग द्राक्ष, पेरू, चिकू यांसारख्या फळबागांसह कांदा, मका आणि सोयाबीनच्या उत्पादनासाठी ओळखला जातो. मात्र, कालव्याच्या भगदाडांतून वाहणारे पाणी शेतात साचल्याने उभ्या पिकांचे नुकसान होत आहे. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले असून, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे आम्हाला शिक्षा का? असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.

> कालव्याच्या भिंतींना मोठी भगदाडे पडली असून भराव दिवसेंदिवस कमी होत आहे. वेळीच लक्ष न दिल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. प्रशासनाने तत्काळ याची दखल घेऊन दुरुस्ती करावी.
>
> **– निलेश चव्हाण (निवेदनकर्ते)**

**ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या :**

१. सोनवणे वस्तीजवळील सायपन आणि पडलेल्या भिंतीची तातडीने दुरुस्ती व्हावी.

२. खचलेल्या भरावाचे मजबुतीकरण करून पाणी गळती थांबवावी.

३. रहिवासी वस्तीजवळील धोकादायक काँक्रिटीकरणाची कायम स्वरूपी सुधारणा करावी. या निवेदनाची प्रत पालखेड पाटबंधारे विभागाला सोपवण्यात आली असून, आता विभाग यावर तातडीने कार्यवाही करतो की शेतकऱ्यांचे नुकसान उघड्या डोळ्यांनी पाहतो, याकडे संपूर्ण विंचूरकरांचे लक्ष लागले आहे.

# महाबळेश्वर पालिकेच्या ताफ्यात अत्याधुनिक शववाहिनी दाखल !

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२९, महाबळेश्वर :** महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेची अनेक दिवसांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. पालिकेला महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत नवीन अत्याधुनिक आणि सुसज्ज शववाहिनी प्राप्त झाली असून, यामुळे शहरातील नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

**जुन्या वाहनाची दयनीय अवस्था**

नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेली जुनी शववाहिनी पूर्णपणे जीर्ण झाली होती. या वाहनाची अवस्था इतकी बिकट होती की, दरवाजे दोरखंडाने बांधावे लागत होते, सीट्स फाटलेल्या होत्या आणि टायरही पूर्णपणे घासले गेले होते. पावसाळ्यात तर गाडीच्या टपातातून पाणी गळत असल्याने मृतदेहाची विटंबना होण्याची भीती व्यक्त केली जात होती. या असुरक्षित आणि दयनीय व्यवस्थेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व नाराजी पाहायला मिळत होती.

> शहरासाठी ही अत्यंत महत्त्वाची गरज होती. नवीन शववाहिनीमुळे मृतांच्या नातेवाईकांना होणारा मनस्ताप कमी होईल आणि सन्मानजनक सेवा देता येईल.
>
> **– प्रशासन, महाबळेश्वर नगरपरिषद**

**अत्याधुनिक सुविधांनी सज्ज**



नव्याने प्राप्त झालेली शववाहिनी ही वातानुकूलित असून सर्व आधुनिक सुविधांनी सज्ज आहे. मृतदेहाची वाहतूक अत्यंत सुरक्षित, स्वच्छ आणि सन्मानजनक पद्धतीने व्हावी, या दृष्टीने या वाहनाची बांधणी करण्यात आली आहे. हे वाहन लवकरच अधिकृतपणे सेवेत दाखल होणार आहे.

**लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा अन् प्रशासकीय वेग...**

या नवीन वाहनासाठी लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील शिंदे आणि मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता.

त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून, प्रशासकीय पातळीवर मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी या प्रस्तावावर वेगाने कार्यवाही करत तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केली. या आधुनिक सुविधेमुळे महाबळेश्वरकरांनी समाधान व्यक्त केले असून, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे कौतुक होत आहे.

# महाराष्ट्र राज्य वर्धापन दिनाच्या मुख्य शासकीय समारंभाची रंगीत तालीम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, मुंबई :** महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर शुक्रवार, १ मे २०२६ रोजी मुख्य शासकीय समारंभ आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची रंगीत तालीम याच मैदानावर घेण्यात आली. यावेळी ध्वजवंदन राजशिष्टाचार विभागाचे उपसचिव चंद्रकांत मोरे यांनी केले. राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत आणि राज्यगीताने ध्वजाला सलामी देण्यात आली.

शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी गृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मधुकर पांडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



या कार्यक्रमात २६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या प्रजासत्ताक दिन समारोहात उत्कृष्ट संचलन केलेल्या पथकांना अपर पोलीस महासंचालक मधुकर पांडे यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. यामध्ये सशस्त्र दल, नि:शस्त्र दल आणि शालेय पथकास पारितोषिक देण्यात आले. सशस्त्र दलांमध्ये प्रथम पारितोषिक राज्य राखीव पोलीस पथक, द्वितीय पारितोषिक बृहन्मुंबई पोलीस सशस्त्र पुरुष पथक आणि तृतीय पारितोषिक संयुक्तपणे बृहन्मुंबई दंगल नियंत्रण पथक, गोंदिया व गडचिरोली जिल्ह्याचे सी ६० पथक यांनी पटकाविला.

नि:शस्त्र दलांमध्ये प्रथम पुरस्कार मुंबई अग्निशमन दल, द्वितीय पुरस्कार सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, तृतीय क्रमांक राज्य उत्पादन शुल्क यांनी पटकाविला.

या संचलनामध्ये शालेय पथके सहभागी झाली होती. शालेय पथकांमध्ये प्रथम पुरस्कार रोड सेफ्टी पेट्रोल मुलींच्या रुस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहिसर यांच्या पथकास, द्वितीय पुरस्कार मुलांच्या डॉ.ॲन्टोनियो डा सिल्वा हायस्कूल, दादर यांच्या पथकास आणि तृतीय पुरस्कार मुले सेंट पॉल हायस्कूल, दादर यांच्या पथकाने पटकाविला.

याशिवाय केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या वतीने शासकीय शाळांमधील आठवी आणि नववीच्या विद्यार्थ्यांना सशस्त्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरण अंतर्गत स्टुडंट पोलीस कॅडेट प्रोग्राम राबविण्यात येत आहे. यामध्ये शासकीय व बृहन्मुंबई महापालिकेच्या २४४ शाळांमध्ये हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे.२०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये पोलीस कॅडेट प्रोग्रॅम अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या शाळांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये प्रथम पुरस्कार मराठी मुंबई पब्लिक स्कूल, विलेपार्ले (पश्चिम), द्वितीय पुरस्कार एस.एस.एस मल्टीपर्पज टेक्निकल हायस्कूल मुंबई आणि तृतीय पुरस्कार अंजुमन आय इस्लाम बद्रुद्दिन तैयबजी हायस्कूल मुंबई यांनी पटकाविला.

यानंतर राज्य राखीव पोलीस दल, बृहन्मुंबई सशस्त्र पोलीस दल, बृहन्मुंबई दंगल नियंत्रण पथक, बृहन्मुंबई सशस्त्र महिला पोलीस दल, निशाण टोळी (महाराष्ट्र पोलीस ध्वज, बृहन्मुंबई पोलीस ध्वज, राज्य राखीव पोलीस बल ध्वज, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय ध्वज, बृहन्मुंबई अग्निशमन दल ध्वज, गृहरक्षक दल ध्वज), मुंबई लोहमार्ग पोलीस दल, मुंबईत पुरुष पोलीस दल, बृहन्मुंबई वाहतूक पोलीस दल, गृहरक्षक दल महिला पथक, मुंबई अग्निशमन दल,मुंबई महापालिका सुरक्षा रक्षक दल, सुरक्षा सुरक्षा मंडळ दल मुंबई आणि ठाणे जिल्हा, पाईप बँड पथक, बृहन्मुंबई पोलिस महिला पाईप बँड पथक, ब्रास बँड पथक, अश्व दल पोलीस पथक, महिला निर्भया पथक यांनी मानवंदना दिली.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानी जोशी आणि पल्लवी मुजुमदार यांनी केले.

# थोडक्यात

## अचानक लागलेल्या आगीत अंजनाई गोशाळेचा चारा जळून खाक...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, सोयगाव :** तालुक्यातील आमखेडा येथे क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था संचालित अंजनाई गोशाळेत मंगळवारी (ता.२८) दुपारी अचानक लागलेल्या आगीत सुमारे ३० क्विंटल चारा व गुरांना खाऊ घालण्यासाठी साठवलेले साहित्य जळून खाक झाले. या घटनेत सुमारे सव्वा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुदैवाने आग लागली तेव्हा गुरे बाहेर चरत असल्याने जीवितहानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी तीनच्या सुमारास गोशाळेतील चाऱ्याला अचानक आग लागली. काही वेळातच आगीने विक्राळ रूप धारण केल्याने परिसरात एकच धावपळ उडाली. आग विझविण्यासाठी ग्रामस्थांनी तातडीने धाव घेतली. ज्ञानेश्वर गाडेकर, अनिल लोखंडे, रामेश्वर बोडखे, एकनाथ ठोंबरे, पवन आगे, ज्ञानेश्वर जाधव, संदीप इंगळे, दिलीप शिंदे आदींनी आटोकाट प्रयत्न केले.

वादळी वाऱ्यामुळे आग अधिकच भडकत असल्याने नियंत्रण मिळविण्यास अडचणी निर्माण झाल्या. तब्बल पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र तोपर्यंत मोठ्या प्रमाणावर चारा व साहित्य जळून खाक झाले होते.

दरम्यान, ग्राम महसूल अधिकारी महेंद्र वारकड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून अहवाल तहसील कार्यालयात सादर करण्यात आला आहे.

## ग्राहकांच्या विश्वासास पात्र महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रथम वर्धापनदिनी विविध उपक्रम



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२९, पंढरपूर :** भारत सरकारच्या एक राज्य एक ग्रामीण बँक धोरणानुसार दिनांक १ मे २०२५ रोजी एकत्रीकरण होऊन स्थापन झालेली महाराष्ट्र ग्रामीण बँकने राज्यभर ७५६ शाखांचे मजबूत जाळे उभे करून ग्राहकांच्या विश्वासाची बँक म्हणून कार्यरत आहे. या बँन्केच्या प्रथम वर्धापनदिनी विविध शाखांचे माध्यमातून

ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, उद्योजक, व्यापारी व युवकांच्या आर्थिक प्रगतीसाठी विविध बचत, ठेव व कर्ज योजना उपलब्ध करून देण्यात येणार अआहे.

सर्व वित्तीय गरजांसाठी विश्वासू साथी – महाराष्ट्र ग्रामीण बँक १ मे वर्धापन दिनानिमित्य बँकेच्या सर्व ग्राहक, हितचिंतक व कर्मचारीवृंदास शुभेच्छांसह विशेष कर्ज योजना यामध्ये गृह कर्ज

व्याजदर ७.१०% व ९०% पर्यंत कर्ज उपलब्ध कर्जाची परतफेड ३० वर्षाच्या मुदतीपर्यंत, कमी EMI वर

वाहन /कार कर्ज व्याजदर ७.५०% व ८५% पर्यंत कर्ज उपलब्ध एम एस एम ई व्यवसाय कर्ज

व्याजदर ९.२५% जलद कर्ज मंजुरी वाढीव कर्जमर्यादा

डॉक्टर स्पेशल लोन व्याजदर ९.५०%

क्लिन लोन २५ लाखापर्यंत मालमत्ता निर्मीतीसाठी ५० लाख रूपयापर्यंतचे विनातारण कर्ज GST

जी एस टि क्रेडिट कर्ज योजना व्याजदर ९.२५% किमान कागदपत्र त्वरीत कर्ज मंजूरी सीजीटीएमएसई सुरक्षा उपलब्ध, मालमत्तेवर वैयक्तिक कर्ज

व्याजदर १०.२५% किमान कागदपत्र मुदत कर्ज / ओव्हर ड्रॉफ्ट सुविधा, सौर ऊर्जा प्रकल्प कर्ज

व्याजदर ८.७५% घरगुती / व्यावसायिक वापरासाठी

सोने तारण कर्ज व्याजदर ८.७५% व २० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध प्रक्रिया शुल्क माफी मुद्रांक शुल्क रहित. मुदत कर्ज / ओव्हर ड्राफ्ट सुविधा त्वरीत कर्ज वितरण

**नियम व अटिच्या अधिन सुविधा देण्यात येत आहेत.**

बचत आणि चालु खाते, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिग, लॉकर सुविधा, व्हिडीओ केवायसी खाते, एम स्वाईप युपीआय बॉक्स, डेबिट कार्ड युपीआय सुविधा, जीवन / आरोग्य / सामान्य विमा यासंदर्भात जवळच्या शाखेशी संपर्क करण्याचे आवाहन कबनुर (इचलकरंजी) येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखाधिकारी नवनाथ गावडे यांनी केले आहे.

## लोकसेवा हक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल उपविभागीय अधिकारी लाहोटी यांचा गौरव

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२९, जिंतूर :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शक, गतिमान व निश्चित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांचा माननीय जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.उपविभागीय अधिकारी म्हणून लाहोटी यांच्या कार्यक्षेत्रात सेलू व जिंतूर या दोन महत्त्वाच्या तालुक्यांचा समावेश असून, विशेषतः जिंतूर तालुका हा भौगोलिकदृष्ट्या विस्तृत व कामकाजाच्या दृष्टीने आव्हानात्मक मानला जातो. मोठा भौगोलिक विस्तार, विविध प्रशासकीय कामांचा व्याप आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा या सर्व बाबींचा प्रभावीपणे सामना करत त्यांनी प्रशासनाची गती कायम ठेवली आहे. लोकसेवा हक्क कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करत नागरिकांना विहित मुदतीत सेवा मिळाव्यात यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे विविध शासकीय सेवा सुलभ, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होत असून, प्रशासनावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही प्रशासनाच्या विश्वासार्हतेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. श्री.लाहोटी यांचे कार्य इतर अधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

या गौरवामुळे प्रशासनातील सकारात्मक कार्यपद्धतीला चालना मिळणार असून नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षमपणे देण्यास मदत होणार आहे. उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.